## आय विटनेस भुयारांमध्ये होणार मेट्रोची चाचणी







आरे कारशेडच्या प्रतिबंधित क्षेत्राबाहेर म्हणजे मरोळ - मरोशी रोडच्या पश्चिमेकडील रॅम्पच्या सुरुवातीलाच एक तात्पुरती सुविधा निर्माण केली जात आहे. मार्च महिन्याच्या शेवटी एक ट्रेन येणे अपेक्षित आहे. ती ट्रेन याच तात्पुरत्या सुविधेमध्ये उतरवण्यात येणार आहे. त्यानंतर ट्रेनच्या चाचण्या होतील. ट्रेनची चाचणी विविध मानकांवर होणार आहे. दहा हजार किलोमीटरच्या अंतराच्या चाचणीदरम्यान स्पीड, ऑसिलेशन, इमर्जन्सी ब्रेक डिस्टन्स अशा चाचण्यांचा समावेश असेल. या चाचण्या तात्पुरत्या सुविधेपासून सुरुवात होऊन भुयारांमध्ये पुढील चाचण्या घेण्यात येणार आहेत, अशी माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल यांनी दिली. दरम्यान, प्रोटो-टाईप ट्रेनच्या चाचण्या या ठिकाणी घेण्यासाठीची आवश्यक मंजुरी शासनाने दिलेली आहे.